<u>नियमित दिवाणी दावा क्र.६५१/२०२३.</u>

रेखाबाई ज्ञानेश्वर गुळुमकर व इतर वि.

कलेक्टर साो. सोलापूर व इतर

CNRNOMHSO100014842023

## निशाणी १०० खालील आदेश

(दिनांक– ०८/०२/२०२४)

वादीच्या शेतात रस्त्याचे पाणी येवून नुकसान होत आहे, म्हणून प्रतिवादीने पुर्वीच्या चारीने पाणी पुर्वीच्याच मार्गाने जांबुड हद्दीत सोडावे.

२. थोडक्यात अर्ज आहे की, प्रतिवादीने सरळ रेषेमध्ये रस्ता न करता, उत्तर बाजुने वादीच्या हद्दीतुन पाण्याची चारी बंद करुन पुर्वीच्या रस्त्याच्या खाली सिमेंटच्या नळया टाकलेल्या आहे, त्यातून पुर्वीचे चारीचे पाणी जात होते, ती चारी बदलून चारी रस्त्याच्या पुर्वेकडून वळून, ते पाणी रस्त्यावर सोडले आहे. रस्त्यावर सोडलेले पाणी वादीच्या शेतात येवून वादीचे सुमारे ५ एकर क्षेत्राचे नुकसान होत आहे. तरी, विठ्ठलवाडी गट नं.११३ मधून आलेली चारी उत्तरेकडे वादीच्या हद्दीतून सिमेंटच्या टाकलेल्या नळयातून पुर्वीच्या असलेल्या चारीतून जात होते, तसे पाणी जाणे गरजेचे आहे. म्हणून अर्ज मंजूर करावा.

३. या अर्जास प्रतिवादीने नि.क्र.१०३ वर म्हणणे दाखल केले आहे की,

सदरचा दावा निरंतर ताकीदीसाठी आहे. या दाव्यात वादीने त्याच्या जमीनीतून रस्ता काढण्याचा प्रयत्न करु नये व मुळ रेखांकनानुसार रस्ता तयार करावा, अशा मजकुराचा दाखल केला, परंतु या अर्जात वादीने वेगळीच दाद मागून अर्ज दाखल केला आहे. रस्ता पुर्णत्वास गेल्यानंतर रस्ता होण्यापुर्वी जेथून पाणी जात होते, तेथून सद्य परिस्थीतीत ठिकठिकाणी पाणी वाहून जाण्यासाठी मोरी तयार केली आहे. रस्ता करण्याअगोदर अंक्षाश व रेखांश व तारीख दर्शविणारे फोटो काढून त्यामध्ये मोरी बांधलेल्या आहेत, असे स्पष्ट दिसते. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. मी वादीचे विधीज्ञ व सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, रस्त्याचे पाणी वादीच्या शेतात येते, त्यामुळे वादीचे नुकसान होत आहे. याउलट, प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादीचा दावा हा रस्त्याबद्दलचा आहे, रस्त्यावरील पाण्याबद्दलचा नाही. पुर्वी जशा नाल्या होत्या, तशा काढून पाण्याचा प्रवाह पुर्ववत करुन दिला आहे, रस्ता तयार करताना अंक्षाश व रेखांश तयार करुन रस्ता तयार केला आहे, त्याप्रमाणे फोटो काढले आहेत, ते फोटो म्हणण्यासोबत दाखल केले आहे. वादीच्या विधीज्ञांनी शेवटी युक्तीवाद केला की, रस्त्यावरचे पाणी वादीच्या शेतात येवू नये.

५. मी प्रतिवादीने दाखल केलेले फोटोग्राफ्स नि.क्र.१०४ सोबतचे पाहिले, त्यामध्ये विटा व पत्र्याच्या कच्च्या बांधकामासमोर नाली आहे, असे दिसून येत नाही. त्याचबरोबर दुस–या फोटोमध्ये नाली बुजविल्याचे दिसून येते, त्यामुळे वादीच्या शेतात रस्त्याचे पाणी जाण्याची दाट शक्यता आहे. जर रस्त्याचे पाणी वादीच्या शेतात गेले तर, वादीचे न भरुन येणारे नुकसान होईल. वादीचा दावा हा रस्त्याच्या वादाबद्दलचा आहे आणि त्या रस्त्यावरचे पाणी वादीच्या शेतात येवू नये, ही वादीची मागणी, त्या रस्त्याच्या वादासंबंधी असल्यामुळे, आजच्या घडीला प्रतिवादीविरुध्द आदेश दिला तर, प्रतिवादीचे काही नुकसान होणार नाही उलट, वादीचे नुकसान होत आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

वादीच्या शेतात वादातील रस्त्यावरील पाणी जावू नये याबद्दल प्रतिवादीने योग्य कारवाई करावी.

स्वाक्षरी/–

दिनांक –०८/०२/२०२४.

(यु.व्ही.जोशी)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, माळशिरस.